# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ २०२ /२०२४ | पुणे दिनांक -१० /०१/२०२४

पुणे शहर डेक्कन वाहतुक विभागामध्ये 'हेरीटेज हॅन्डव्हिवींग रिव्हायव्हल चॅरिटेबल ट्रस्ट' शिवाजीनगर, पुणे या संस्थेतर्फे दि.२२/०१/२०२४ रोजीच्या आयोध्या मंदिराचे लोकार्पन सोहळयानिमीत्त 'सौदामिनी हॅन्डलुम' मार्फत दिनांक १२/०१/२०२४ रोजी आयोध्याला जाणाऱ्या वस्त्र पुजनाचा कार्यक्रम गुडलक चौक ते गरवारे ब्रीजच्या दरम्यान सकाळी ०५:०० ते १०:०० वा.पर्यंत असल्याने पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहरातील फर्ग्युसन कॉलेज रोडवरील वाहतूकीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

❖ <u>दिनांक १२/०१/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे फर्ग्युसन कॉलेज रोडवरील वाहतूकीमध्ये बदल करण्यात येत आहे.</u>

- कर्वे रोडकडुन फर्ग्युसन रोडकडे येणारी वाहतूक ही पौड पुलाखालुन आठवले चौक ते लॉ कॉलेज रोडवरून भांडारकर रोड मार्गे गुडलक चौकातून इच्छितस्थळी जातील.
- टिळक चौकातुन खंडोजीबाबा चौकाकडे येणारी वाहतूक ही खंडोजीबाबा चौकातून डावीकडे कर्वे रोडकडे वळन घेवून उजवीकडे प्रभात रोडने पुढे गली नं. ७ मधुन भांडारकर रोडवरून पुढे इच्छितस्थळी जातील.
- जंगली महाराज रोडवरून येणारी वाहतूक ही नटराज चौकामधुन गुडलक चौक मार्गे (गुडलक चौक ते नटराज चौक हा रस्ता नमुद कालावधीकरीता दुहेरी वाहतूक करण्यात येत आहे.) पुढे इच्छितस्थळी जातील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रतः- सर्व संबंधीतांना